नि.फौ.ख.क्र.२१०/२०१८
सरकार वि. देवराव
नि.क्र.२०

साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–सुधाकर क्रिष्णाजी भेंडे
वय ६६ वर्ष, व्यवसाय–शेती.
राह.पिपरा, तह.उमरेड, जि.नागपुर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

१. माझ्यासमक्ष पोलिसांनी काही जप्तीपत्रक तयार केलेले नाही. आता मला दि.१७/०९/२०१८ रोजीचे दोन जप्तीपत्रके दाखविण्यात आली त्यावर माझ्या सह्या आहेत त्यातील मजकुर मला माहीती नाही. सदर सह्यांना अनुक्रमे **नि.क्र.२१ व २२** देण्यात आला.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१७/०९/२०१८ रोजी पोलिसांनी मला पिपरा येथे पोलिस स्टेशनला बोलविले होते व देविदास रामदास मेंघरे यांच्याकडुन रक्ताचा नमुना बी फॉर्म जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, देविदास रामदास मेंघरे याचे कपडे माझ्यासमक्ष जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा ओळखीचा असल्यामुळे मी त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.ए.बी.पोंगळे यांनी उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०१.०२.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड